श्री राम चंद्र मिशन

ECHOES
इंडिया वार्तापत्र

# पू.बाबुजी महाराजांचा ११६ वा जयंती समारोह




## प्रारंभीची घोषणा

दि. १२ जानेवारी २०१५ रोजी आदरणीय गुरुदेव कमलेशभाईंनी सहज संदेशच्या माध्यमातून जगभरातील अभ्यासींसमोर घोषणा केली की या वर्षी बाबूजी महाराजांचा जयंती समारंभ दि. २९ एप्रिल ते १ मे २०१५ या कालावधीत लखनौ येथे साजरा करण्यात येईल. त्यासाठी तेथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी सर्वांना केले.

## उत्सवाची पूर्वतयारी

उत्सवाचे यजमानपद लखनौला देण्यात आल्याची घोषणा होताच लखनौमध्ये उत्सवाच्या तयारीचे काम सुरु झाले. २०१० साली प्रिय चारीजी महाराजांच्या वाढदिवसाच्या समारंभाचे यजमानपद भूषविल्यानंतर, सुमारे पाच वर्षांनंतर या समारंभाचे यजमानपद भूषविण्याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

उत्सव समितीने समारंभाच्या व्यवस्थेसंबंधी परिपत्रके पाठविण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर नोंदणीकरण प्रक्रियेस सुरुवात केली. उत्सवाचे संचालन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करण्याकरीता स्वयंसेवकांचे वेगवेगळे गट तयार करण्यात आले जेणेकरुन येणाऱ्या सर्व अभ्यासींना आवश्यक त्या गोष्टी पुरवून त्यांना उत्सवाच्या विशेष वातावरणामध्ये एकरूप होण्यास सहाय्य व्हावे.

समारंभस्थळी एक छोटासा परंतु समर्पित गट अथकपणे काम करीत होता. गुरुदेव कमलेशभाईंचे उत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी दि. १५ एप्रिल रोजी लखनौ आश्रम येथे आगमन झाले व त्यांनी स्वयंपाकगृह, सर्वसाधारण निवासव्यवस्था, सुखनिवास सुविधा, उपाहारगृह, पुस्तक विक्री केंद्र, वैद्यकीय उपचारकेंद्र, बालकेंद्र व निरनिराळ्या व्यवस्थांसाठी उभारणी केली जात असलेल्या इतर केंद्रांना भेट दिली. समारंभाच्या तयारीची प्रगती पाहून त्यांनी संतोष व्यक्त केला व त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी सूचना केल्या.

## भंडाऱ्यासाठी गुरुदेवांचे आगमन

दि. २७ एप्रिल रोजी दुपारी आ. कमलेशभाईंचे हैद्राबाद येथून लखनौ येथे समारंभासाठी आगमन झाले. बऱ्याच काळापासून सर्वजण उत्सुकतेने वाट पाहत असलेल्या या सोहोळ्यासाठी त्यांचे प्रेमपूर्वक हार्दिक स्वागत करण्यात आले.

दि. २७चा संध्याकाळचा सत्संग तसेच दि. २८ रोजी दोन सत्संग त्यांनी संचालित केले. दि. २८च्या सकाळी तीन तासांहूनही अधिक




वेळ उपाहारगृहाची कूपन्स वाटताना त्यांना पाहून अभ्यासींना सुखद आश्चर्याचा धक्का बसला आणि प्रत्येकजण त्यांच्याकडून कूपन्स मिळविण्यासाठी रांगेत उभा राहू लागला. त्या दिवशी त्यांनी पाच विवाह संपन्न केले.

### समारंभस्थळ

इतक्या विशाल समुदायासाठी लखनौ येथे समारंभासाठी आलेल्या सोयीसुविधा विस्तृत क्षेत्रामध्ये पसरल्या होत्या. एका टोकाला नोंदणीकरण व बेडिंग कक्ष तसेच अभ्यासींना राहण्यासाठी तंबू, स्वयंपाकगृह व भोजनगृहाची व्यवस्था करण्यात आली होती तर ध्यानमंडपाकडे जाणाऱ्या मार्गावर पिण्याचे पाणी, पुस्तक विक्री केंद्र, देणगी कक्ष, बँकिंग कक्ष व विविध खाद्यपदार्थ व स्वादिष्ट पक्वान्नांची रेलचेल असलेले मोठे उपाहारगृह यांची सोय करण्यात आली होती. ध्यानमंडपाकडे जाण्याच्या मार्गावर उपाहारगृहाला लागून बालकेंद्राची उभारणी करण्यात आली होती ज्यामुळे अभ्यासींना ध्यानमंडपाकडे जाताजाता आपल्या मुलांना तेथे सोडणे सोयीस्कर वाटत होते. तंबूंपासून ध्यानमंडपाच्या प्रवेशद्वारापर्यंत अभ्यासींना घेऊन जाण्यासाठी परिवहन व्यवस्थाही करण्यात आली होती. ध्यानमंडपाच्या एका बाजूला सुखनिवास व एक छोटे उपाहारगृह तर दुसऱ्या बाजूला गुरुदेवांचे कुटीर होते.

पुस्तक विक्री केंद्र विस्तृत जागेवर उभे होते व त्यातील एका मोठ्या विभागात विक्रीसाठी फोटो प्रदर्शित केलेले होते. एखाद्या मॉलमध्ये गेल्याप्रमाणे यावेळचा अनुभव अभिनव असा वाटत होता. ग्रंथभांडारातल्या ग्रंथ-दालनामध्ये कोणीही फेरफटका मारून स्टॉलवरील पुस्तके चाळत कोणतेही पुस्तक, डीव्हीडी किंवा एम.पी.३ उचलून आपल्या आवडीची दुसरी वस्तू घेण्यासाठी दुसऱ्या स्टॉलकडे प्रयाण करू शकत होता. प्रथमच एक केंद्रीय बिलिंग यंत्रणा उभी करण्यात आलेली होती व कोणीही आपले बिल भागविण्यासाठी दहापैकी कोणत्याही एका काऊंटरवर जाऊन रोखीने अथवा क्रेडिट कार्डद्वारा बिल अदा करू शकत होता. कनेक्टिव्हिटीच्या समस्येमुळे क्रेडिट कार्डाच्या साहाय्याने रक्कम अदा करण्यात काहीशा अडचणींचा सामना करावा लागला तरीही एकंदरीत पुस्तक विक्रीच्या या अभिनव पद्धतीमुळे प्रत्येकाला खरेदीचा अनुभव सुखकारक वाटत होता.

### ध्यानमंडप

तथापि, सर्वात जास्त प्रभावित करणारी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे १,५४,००० चौ. फू. जागा व्यापणारा भव्य असा ध्यानमंडप. खास जर्मन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्याची रचना करण्यात आलेली होती ज्यामुळे १३० फुटांच्या प्रदीर्घ अंतरावरसुद्धा आधारासाठी खांबांची गरज नव्हती व अभ्यासींना संपूर्ण व्यासपीठ अडथळ्याशिवाय दिसू शकत होते. एक व्यासपीठ व अनेक एल.इ.डी. पडदे उभे करण्यात आले होते. त्यामुळे व्यासपीठावर चाललेले कामकाज अभ्यासींना आरामात पाहता येत होते. जमिनीवर बसणाऱ्यांसाठी, स्वतःच्या खुर्च्यांवर बसणाऱ्यांसाठी तसेच ज्यांना आवश्यकता आहे अशांसाठी मांडण्यात आलेल्या खुर्च्यांवर बसणाऱ्यांसाठी असणाऱ्या विशाल विभागांसह वेगवेगळ्या विभागांची सोय करण्यात आलेली होती. या ऋतुमध्ये लखनौमध्ये असणारा उष्मा लक्षात घेऊन ध्यानमंडपाच्या छतावर पीव्हीसी पत्र्यांचे विशेष आच्छादन घालण्यात आले होते. त्यामुळे केवळ ध्यानमंडपातील तापमानच कमी होत नव्हते तर त्याचे पावसापासूनही संरक्षण होऊ शकत होते. ध्यानमंडपात मोठ्या संख्येने छताखाली पंखे लावण्यात आलेले होते तसेच मंडपाच्या दोन्ही बाजूंनी पाण्याचे तुषार प्रक्षेपित करणारे पंखे बसविले होते. यामुळे ध्यानासाठी आरामदायक वातावरण निर्माण झाले होते.

### स्वयंसेवक

समर्पित स्वयंसेवकांच्या चमूशिवाय कोणताही समारंभ यशस्वी होऊ







शकत नाही. परिवहन व्यवस्था, गृहव्यवस्थापन, ध्यानमंडप, सुरक्षा, वैद्यकीय उपचार, इ. विविध उपक्रमांमध्ये सर्व वयोगटांतील स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. या भंडाऱ्यातील एक मनोरंजक बदल म्हणजे स्वयंसेवकांनी ते करीत असलेल्या कामाशी संबंधित समर्पक शब्द लिहिलेल्या फिती दंडास बांधल्या होत्या. सुरक्षेशी संबंधित स्वयंसेवकांनी 'नम्रता' तर गृहव्यवस्थापन क्षेत्रातील स्वयंसेवकांनी 'सेवा' तसेच वैद्यकीय उपचार करणाऱ्यांनी 'प्रेम' व ध्यानकक्षाच्या स्वयंसेवकांनी 'शांतता' हे शब्द लिहिलेल्या समर्पक फिती लावल्या होत्या.

## नोंदणी

२८०० लहान मुलांसहित सुमारे २०,००० अभ्यासी भंडाऱ्यात सहभागी झाले होते.

## उत्सव

दि. २९ एप्रिल रोजी सकाळच्या ६:३० वाजताच्या सत्संगाने उत्सवाची सुरुवात झाली. व्यासपीठावर नयनरम्य अशी पार्श्वभूमी तयार करण्यात आली होती. त्यामध्ये एका बाजूस बाबूजींचे छायाचित्र होते व दुसऱ्या बाजूस 'पवित्र प्रेमासमवेत एकता' हे शब्द लिहिलेले होते.

सत्संगानंतर काही लहान मुलांना मंचावर आंमंत्रित करण्यात आले व नवीन डिव्हिडींचे, ध्वनीमुद्रित पुस्तकांचे (ऑडियो बुक्स) तसेच पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

## पूज्य गुरूदेवांचे प्रथम भाषण

अभ्यासींना सुखद धक्का म्हणजे कमलेश भाई तीन गोष्टींविषयी बोलले: प्रार्थना, शुद्धिकरण आणि आध्यात्मिक स्थिती टिकवून ठेवणे.

- सहजमार्गात आपण म्हणतो की "आम्ही अद्यापही इच्छांचे गुलाम आहोत" आणि "तूच एकमात्र ईश्वर आणि शक्ती आहेस जो आम्हाला त्या स्थितीपर्यंत नेऊ शकेल." तर अशा प्रकारे प्रार्थनेमध्ये आपण अनेकवचन "आम्ही" वापरतो, एकवचनी "मी" वापरत नाही. 'मी' च्या वापराने आपण प्रार्थनेला स्वत:पुरते संकुचित करीत असतो. प्रार्थना ही केवळ माझ्या एकट्यापुरती मर्यादित नाही, तर ती आपणा सर्वांसाठी आहे.
- शुद्धिकरणासंदर्भात– जर आपण असा विचार करत बसलो की माझ्यातून जटिलपणा निघून जात आहे तर आपणांमध्ये केवळ साधेपणा राहील आणि आपण जर असा विचार केला की आपल्यामधून अशुद्धी निघून जात आहे तर जे उरेल ते केवळ पावित्र्य असेल.
- आध्यात्मिक अवस्थेसंदर्भात : ज्याप्रमाणे माता स्वत:च्या उदरात नऊ महिने बालकाला वाढविते आणि नऊ महिन्यांनतर भौतिक जगात जन्म देते त्याप्रमाणे गुरुदेवही अभ्यासीला ईश्वरीय जगतामध्ये जन्मास घालण्याआधी, अभ्यासीच्या आध्यात्मिक अस्तित्वाला त्यांच्या 'मानस'मध्ये (मनात) सात महिने सांभाळून





ठेवतात, ज्याच्याशी आपण नंतर एकरूप होतो. त्यांनी यावेळी अभ्यासींना गुरुदेवांशी कायमचे आंतरिक संबंध प्रस्थापित करण्यास सांगितले आणि यासाठी शिस्तीची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले.

सकाळच्या ११ वाजताच्या सत्संगानंतर 'कम्प्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र' खंड ५ या पुस्तकाच्या विशेष आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. १९४० ते १९७० या कालावधीतील कधीही प्रकाशित न करण्यात आलेले लेख, पत्रांचे अंश, बाबूजी महाराजांसमवेत झालेल्या अनौपचारीक वार्तालापामधील अवतरणे इत्यादिंचा या आवृत्तीमध्ये समावेश आहे.

संध्याकाळच्या ५:३० वाजताच्या सत्संगानंतर गुरुदेव प्रेम, अभ्यासी सराव सोडून देण्याची कारणे आणि परिवर्तनाला आमंत्रित करुन त्याचे स्वागत करण्याची आवश्यकता याबद्दल बोलले.

- ते म्हणाले प्रेम हे इतके पवित्र आहे की त्याबद्दल वाच्यता करणे निषिद्ध आहे. प्रेमामध्ये, फक्त प्रेमी असतो, प्रेम स्वत: असते आणि प्रियतम असतो.
- आपण अभ्यासी, संस्कारांच्या भरीस अहंकाराचे भले मोठे ओझे वाहतो जे आपल्या प्रगतीस व परिवर्नास अडसर आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

.'बदल' या संबंधी बोलताना ते म्हणाले की, प्रगती करण्यासाठी आपण स्वत:मध्ये परिवर्तन घडवणे आणि परिवर्नास निमंत्रित करणे आवश्यक आहे. आपण बदलास एवढा विरोध करतो, की गुरुदेव जरी आपणांस पुढे घेऊन जाण्यास उत्सुक असले तरी आपल्याला जिथे आहोत तिथेच रहावयाचे असते. जे बदल स्वीकारण्याची आपली क्षमता आहे, तितक्याच बदलांचा गुरुदेव आपल्यासाठी प्रारंभ करतात. हा परिवर्तनाच्या स्वीकाराचा मार्ग, सामान्यांसाठी नाही तर असामान्यांसाठी आहे, कारण परिवतर्नाचा स्वीकार ही सोपी गोष्ट नाही.

**दि. ३० एप्रिल २०१५**

व्यासपीठाचा पार्श्वभाग एका बाजूस प्रिय बाबूजी आणि दुसरीकडे पक्षांचा थवा व 'पवित्र प्रेमासमवेत सुसंवाद' या शब्दांनी सुशोभित केला होता.

सकाळी ६:३० वाजताच्या सत्संगानंतर बंधू गुरप्रीत यांनी दोन भक्तीगीते गायली. यामध्ये सर्व अभ्यासी रंगून गेले. 'बाबूजींचे जीवन' यावरील चित्रफीतीचा पहिला आणि दुसरा भाग ध्यानमंडपात दाखविण्यात आला. ११ वाजताच्या सत्संगानंतर बंधू पी. आर. कृष्णा यांना त्यांचे विचार मांडण्यासाठी तसेच *व्हिस्पर्स फ्रॉम दि ब्राइटर वर्ल्ड* च्या विशेष आवृत्तीचे प्रकाशन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. प्रिय चारीजींसाठी असलेले यातील संदेश लालाजी, बाबूजी, त्यांच्या मातोश्री जानकीदेवी, त्यांच्या पत्नी सुलोचना आणि त्यांचे भाऊ कोथंडरमन या सर्वांकडून मिळालेले आहेत. बंधू कृष्णा यांनी आपल्या भाषणात, ज्या गुरु परंपरेने बंधू कमलेश यांना या निरंतर अशा आध्यात्मिक शोधात, आमच्या नेतृत्वासाठी म्हणून निवडले आहे, त्या गुरु परंपरेचा अभिमान आणि आनंद वाटतो असे प्रतिपादन केले. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, गुरुदेव आपली सेवा करण्यासाठी इथे नसून, ज्यांनी त्यांची निवड केली आहे आणि ज्यांना त्यांनी आश्वासन दिले आहे अशा गुरु परंपरेचे कार्य करण्यासाठी येथे आहेत असे ते पुढे म्हणाले.

चारीजींविषयी बोलताना ते म्हणाले की कितीही त्रास सहन करावा लागला तरी मिशनसाठी काम करताना त्यांना अजिबात दमायला होत नसे. *व्हिस्पर्स फ्रॉम दि ब्राइटर वर्ल्ड* या बद्दल बोलताना ते म्हणाले की, चारीजींना हे संदेश संकलित करुन, एका खास पुस्तकात, भरपूर फोटोंनी सजवून एक विशेष आवृत्ती म्हणून प्रकाशित व्हावे असे वाटत होते. जसजसे पुस्तक तयार होत होते, तसे चारीजी आनंदित होऊन त्यांना मिळणाऱ्या नवीन संदेशांची भर त्यात घालत होते. जेव्हा पुस्तकाची प्राथमिक बांधणीची प्रत तयार झाली, तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

यानंतर निरनिराळ्या प्रकाशनांचे आपल्या सहज मार्ग कुटुंबातील लहान मुलांकडून अनावरण झाले.





संध्याकाळच्या ५:३० वाजताच्या सत्संगानंतर भगिनी रंजना मेहता ह्यांनी दोन भजने गायली. ती श्रोत्यांना गहन मग्नतेत घेऊन गेली. त्यामुळे खास वातावरण अधिक मनोवेधक झाले. यानंतर कमलेशभाईंनी श्रोत्यांना संबोधित केले. त्यांनी टीका न करण्याची नितांत आवश्यकता, आपण एका कुटुंबाचे घटक आहोत हे लक्षात येण्याची गरज व गुरुदेवांसमवेत शाश्वत असे आंतरिक नाते प्रस्थापित करण्याबद्दल सांगितले.

- कमलेशभाईंनी नमूद केले की अभ्यासींच्या टीका करण्याच्या सवयीमुळे ते दुखावले गेले आहेत. ते पुढे म्हणाले की आपण एक कुटुंब आहोत, आणि कुटुंबात ज्याप्रमाणे एकमेकांशी बोलून उत्तरे शोधली जातात तसे आपल्याला करता आले पाहिजे. प्रिय चारीजींच्या महासमाधीनंतर जे काही बदल झाले आहेत त्यावर होणारी टीका त्यांच्या कानावर पडत आहे असे सांगून ते खंबीरपणे म्हणाले की प्रत्येक कृती ही गुरु परंपरेच्या इच्छेनुसारच होत आहे.

- इच्छाशक्ती विषयी बोलताना ते म्हणाले की आपणांस तीव्र इच्छेची (संकल्पाची) गरज आहे आणि त्यासाठी शक्ती ते देतील. (ध्येय) साध्य करण्यास आपण फक्त ती तीव्र इच्छा किंवा दृढ संकल्प करण्याची गरज आहे.

- आपण आपल्या गुरुदेवांसारखे बनण्याची तीव्र इच्छा ठेवली पाहिजे. पण केवळ 'मला तुमच्यासारखे बनवा' असा विचार करणे मूर्खपणाचे आहे. आपल्याला काय बदलायचे आहे, कोणती दुर्बलता दूर केली पाहिजे याचा विचार प्रत्येक पावलाला आपण केला पाहिजे आणि या प्रक्रियेदरम्यान गुरुदेवांशी कायमस्वरूपी असे नाते निर्माण केले पाहिजे. गुरुदेवांचे दर्शन घेण्याच्या वेडाविषयी बोलताना ते म्हणाले बाबूजींना पाहण्यास अनेक लोक येत पण त्यांना (खऱ्या अर्थाने) पाहता येत नसे. ही पाहण्याची बाब नसून अंतर्यामातून जाणण्याची बाब आहे.



**दि. १ मे २०१५**

भंडाऱ्यातील शेवटच्या दिवसाचे विषयसूत्र होते : 'पवित्र प्रेमासमवेत अनामिकत्व'

शेवटच्या सत्संगानंतर कमलेशभाईंनी भंडाऱ्यादरम्यान आपण प्राप्त केलेली स्थिती ओळखण्यावर तसेच स्वत:ला भंडाऱ्यासाठी तयार करणे, आपल्या इच्छांवर मात करणे, ध्यानासाठी एक ठराविक वेळ कायम करणे यावर भाष्य केले. तसेच तिरुवल्लूर येथे होणाऱ्या पुढील भंडाऱ्याकरीता अनेक अभ्यासी उपस्थित राहतील अशी त्यांनी आशा व्यक्त केली.

सर्व स्वयंसेवक, समारंभ समिती, लखनौचे अभ्यासी, आश्रम व्यवस्थापक, आणि भंडारा साजरा करण्यास सामुदायिकपणे काम करण्यास एकत्र आलेल्या प्रत्येकाचे त्यांनी आभार मानले. आपल्या प्रिय चारीजींच्या ८८व्या जयंती समारंभासाठी अभ्यासी मोठ्या प्रमाणात उपस्थित असलेले पाहण्याची प्रेमळ इच्छा त्यांनी व्यक्त केली.

समारोपाच्या सत्संगानंतर आदरणीय कमलेशभाईंनी समारंभ समितीच्या सभासदांची कुटीरामध्ये भेट घेतली व त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे आभार मानून त्यांच्यासोबत अल्पोपाहार घेतला. त्यानंतर सकाळी १० वाजता सहजमार्ग आध्यात्मिक प्रतिष्ठानाच्या (एस.एम.एस. एफ.) विश्वस्तांची बैठक झाली. सकाळी सुमारे ११ वाजता







त्यांनी कार्यकारी समितीची बैठक घेतली व त्यांच्या सोबत दुपारचे भोजन घेतले.

या सोहोळ्यास उपस्थित असलेल्या सर्व अभ्यासींना सुवर्ण पुस्तिकेमध्ये स्वाक्षरी करण्याची विनंती करण्यात आली. युवा अभ्यासींचे जवळपास दहा चमू राहण्याच्या तंबूमध्ये ही सुविधा पुरवण्यासाठी फिरत होते. कमलेशभाईंनी प्रार्थनेसंबंधीच्या नुकत्याच दिलेल्या सूचना व विचार छापलेले एक कार्ड व बाबूजींनी लिहिलेला 'व्यक्तीमत्वाची समस्या' हा लेख एका पत्रकाद्वारे लोकांना वाटण्यात आले.

## मुले आणि युवा केंद्रांमधील उपक्रम

विविध वयाच्या मुलांसाठी उत्साहाने ओतप्रोत असे मुलांचे केंद्र उभारण्यात आले होते. पालकांना कुठल्याही अडथळ्याविना सत्संगासाठी उपस्थित राहता यावे म्हणून हे केंद्र सकाळी ६ पासून ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत खुले होते. अंदाजे २,८०० मुलांची नावे या केंद्रामध्ये नोंदविण्यात आली होती. 'साधेपणा/ सरलता' हे या कार्यक्रमामधील सर्व उपक्रमांचे विषयसूत्र होते. जगभरामधून आलेल्या उत्साही मुलांनी हृदयाच्या आकारामध्ये कापलेल्या चित्रांनी संपूर्ण परिसर सुशोभित केला होता. येथे मुलांसाठी मनोरंजन तसेच त्यांच्या मनात मूल्ये रुजविणाऱ्या कार्यक्रमांची रेलचेल होती. भंडाऱ्यादरम्यान नवीन प्रकाशने सादर करण्याऱ्या मुलांची निवड लकी ड्रॉ द्वारे झाली. या लकी ड्रॉ मध्ये भाग घेण्याची मुलांना मिळालेली संधी हा या कार्यक्रमांमधील एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम होता. कमलेश भाईंच्या उपस्थितीमध्ये बऱ्याच पुस्तकांचे प्रकाशन करण्याची संधी मिळणार असल्यामुळे निवडण्यात आलेली मुले आनंदात होती.

'गच्चीवरील बागकाम' या विषयावरील सत्राने प्रत्येक दिवसाची सुरुवात झाली. यामध्ये माती तयार करणे व रोपटे लावणे या उपक्रमांमध्ये मुले सहभागी झाली. नंतर 'बोलणारे झाड' या उपक्रमाअंतर्गत झाडांशी संवाद साधण्यामध्ये मुलांनी काही काळ शांतपणे वेळ व्यतीत केला. सत्राच्या सुरुवातीला झालेल्या रिलॅक्सेशन तंत्रामध्ये सर्व मुलांनी भाग घेतला. 'नवव्या सूत्राच्या' पाठांतराचे सत्रदेखील यावेळी झाले. मुलांना बाबूजींच्या जीवनाची ओळख व्हावी याकरीता दि. ३० एप्रिल रोजी 'त्यांच्या बालजीवनामधील काही ठळक घटनांवर प्रकाश टाकणारे सादरीकरण' झाले आणि त्यानंतर 'बाबूजींचे जीवन' हा व्हिडीओ सुद्धा दाखविण्यात आला. 'लखनौ शहर' या विषयावर एक छोटे सादरीकरण झाले. दि. २९ आणि ३० रोजी दुपारी उत्तर प्रदेशातील





पर्यटन मंत्रालयाने मुलांच्या मनोरंजनासाठी जादूचे आणि बोलक्या बाहुल्यांचे खेळ आयोजित केले होते. कानपूर, विजयवाडा, लखनौ आणि चेन्नई येथील मुलांनी नृत्य आणि गाण्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. १३ ते १७ या वयोगटामधील मुलांनी 'नासा निभाव' या खेळाचा आनंद लुटला. 'जोडलेले असणे', 'गुरुदेवांप्रति श्रद्धा', 'त्यांच्या कार्याचा प्रसार' अशी विषयसूत्रे असणारी सत्रे संचालित करण्यात आली. स्वत:चे वैयक्तिक तसेच गुरुदेवांचे अनुभव वक्त्यांनी कथन केले.

गुरुदेवांनी पुरस्कृत केलेल्या आईस्क्रीमच्या खाऊने बालक व युवा केंद्राच्या कार्यक्रमाचा समारोप झाला.



## नवीन प्रकाशने

### पुस्तके










कम्प्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र

खंड १ (तामिळ)

कम्प्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र

खंड ४ (हिंदी)

स्टोरी ऑफ डिवाईन रिव्होल्युशन

(इंग्रजी)




कम्प्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र

खंड ५ (इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, मराठी, तामिळ, तेलुगू)

## एम.पी. ३ ऑडियो




व्हिस्पर्स फ्रॉम दि ब्रायटर वर्ल्ड

हिंदी




व्हॉईस रियल

इंग्रजी



कॉमेंटरी ऑन टेन मॅक्झिम्स आणि एफिकसी ऑफ राज योगा

तेलुगू




कॉमेंटरी ऑन टेन मॅक्झिम्स आणि एफिकसी ऑफ राज योगा

उर्दू

## नवीन प्रकाशने

पुढे चालू...




## एम.पी. ३ ऑडियो

रागों के रंग, मालिक के संग

हिंदी










## इंग्रजी डि.व्ही.डी.

फिफ्टी इयर्स ऑफ स्प्लेन्डर

क्लिनलीनेस ॲन्ड प्युरीटी

एक्स्पिरियन्स ॲन्ड कंडिशन

इव्हॉल्व विथ टाईम

रीड ॲन्ड एंजॉय

अ सीड फॉर फ्युचर






















## हिन्दी डि.व्ही.डी.

साधना मे डूबिये

सहज मार्ग को दिलसे अपनाईये

सहज मार्ग के दस नियम– ऋषी रंजन

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2015 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.